# प्रेसनोट

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/पुणे शहर/ ९१०४ /२०१७ पुणे दिनांक – ०७.११.२०१७.

**विषय :- आळंदी कार्तिकी एकादशी सोहळा निमीत्त करण्यात आलेल्या वाहतूक व्यवस्थेबाबत.....**

---

संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज,आळंदी कार्तिकी एकादशी सोहळा दिनांक- ०९/११/२०१७ ते १६/११/२०१७ रोजी पर्यंत पार पडणार असून वारक-यांच्या/भाविकांच्या सुरक्षितेसाठी वायु प्रदुषण व वाहतूक कोंडी होऊ नये,वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालने इष्ट आहे,त्याअर्थी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन जड वाहनांना खालील मार्गावर वाहतुक बंद बाबतचे आदेश निर्गमित करीत आहे. तरी जड वाहनचालकांनी वाहने दिनांक- ०९/११/२०१७ ते १६/११/२०१७ रोजी पर्यंत आळंदी गावातून न जाता खालील पर्यायी मार्गाचा इच्छितस्थळी जाण्यासाठी वापर करावा.

**जड वाहनांकरीता बंद रस्ते-**

१. पुणे-नाशिक महामार्गाकडील मोशी ते आळंदी
२. पुणे- आळंदी रोडवरील मॅक्झीन चौक ते आळंदी

**पर्यायी मार्ग-**

१) पुणे-नाशिक महामार्गावरुन मोशी येथून आळंदीकडे जाणा-या वाहनांनी मोशी ते आळंदी रोडचा वापर न करता त्यांनी चाकण किंवा भोसरी येथून आळंदीकडे जाणा-या पर्यायी मार्गाचा वापर करावा.

२) पुणे ते चाकण आळंदी मार्गे जाणा-या वाहनांनी दिघी मॅग्झीन येथून डाव्या बाजूने भोसरीकडे जावून पुणे नाशिक महामार्गाचा चाकणला जाण्यासाठी वापर करावा.

३) पुणे ते मरकळ आळंदीमार्गे जाणा-या वाहनांनी आळँदी रोड जंक्शन येथून उजवीकडे वळून गोल्फक्लब चौक येथून नगररोडने लोणीकंदफाटा येथून डावीकडे वळून मरकळगावा कडे जावे.

४) मरकळ गावातून पुणेक़डे आळंदीमार्गे येणा-या वाहनांनी धानोरी गावफाटा येथून लोणीकंद मार्गे नगररोडने पुणे येथे जावे.

५) पुणे-नाशिक महामार्गावरुन चाकण येथून जी वाहने आळंदीमार्गे पुणे येथे जातात त्या वाहन चालकांनी चाकण ते भोसरी असा महामार्गाचा वापर करावा व भोसरी येथून डावीकडे वळून दिघी मॅग्झीन येथून इच्छित स्थळी जावे.

तसेच नागरिकांनी/वाहनचालकांनी त्यांना इच्छितस्थळी प्रवास करण्याकरीता खालील संपर्क क्रमांकवर चौकशीकरुन मार्गस्थ व्हावे.

१.पुणे शहर वाहतूक नियंत्रणकक्ष- ०२०-२६१२२००० / ०२०-२६२०८२२५

२. विश्रांतवाडी पोलीस स्टेशन- ०२०-२६६८२५९०

३.पुणे ग्रामीण नियंत्रण कक्ष- ०२०-२५६७१९६२/०२०२५६५७१७१

४.आळंदी पोलीस स्टेशन-०२१३५/२३२२१४